# प्रकरण पहिले

## प्रस्तावना

१.१ प्रस्तावना

१.२ समस्या विधान

१.३ पारिभाषिक शब्दांच्या व्याख्या

१.४ संशोधनाची गृहितके

१.५ संशोधनाची उद्दिष्टे

१.६ संशोधनाचे महत्व

१.७ संशोधनाच्या मर्यादा

१.८ संशोधनाची कार्यपध्दती

१.९ प्रकरणीकरण

१.१० समारोप

# प्रकरण पहिले

# प्रस्तावना

## १.१ प्रस्तावना :

समाजाच्या गरजेतून शिक्षणसंस्थाची निर्मिती झाली. म्हणूनच शिक्षण संस्था या सामाजिक संस्था आहेत. समाजाच्या मदतीशिवाय शिक्षण प्रक्रिया पूर्ण होत नाही. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाचे उद्दिष्ट समोर ठेवून महाराष्ट्र शासनाने १६ मे १९९६ अन्वये एक ठराव मंजूर केला. त्यानुसार १८ ऑक्टोंबर १९९७ रोजी महाराष्ट्र शासनाच्या आदेशानुसार शिक्षण क्षेत्रात एक नवा विचार रूजू झाला. सदर आदेशानुसार प्रत्येक शाळेमध्ये पालक शिक्षक संघ असावा. त्याच्या वर्षभरातून कमीतकमी चार बैठका व्हाव्यात अशी सक्ती करण्यात आली. या सक्तीच्या कार्यक्षेत्रात मान्यताप्राप्त, अनुदानीत विनाअनुदानात सर्व शाळांचा समावेश करण्यात आला आहे. ( परिशिष्ट 'अ'.) पालक –शिक्षक संघ हा १९९७ पासून कार्यरत झाला आहे. त्याला आज जवळ जवळ नऊ वर्षे पूर्ण होत आहेत. त्यानुसार हा पालक शिक्षक संघ विद्यार्थ्यांच्या विकासाबाबतीत नेमकी कोणती भूमिका पार पाडत आहे. याची कार्यवाही कोणत्या प्रकारची आहे. हा पालक–शिक्षक संघ शाळा, समाज, देश, यांच्या विकासात कोणते योगदान देतो याच्या विषयी जाणून घेणे महत्वाचे आहे.

पूर्वीच्या काळी शिक्षण हे एका ज्ञानी, शिक्षित सर्वज्ञात असलेल्या पूर्णज्ञानी व्यक्तीकडून मिळत असे. शिक्षण हे फक्त पुस्तकी ज्ञान नसून शारीरिक व आत्मिक ज्ञानानी परिपूर्ण असे होते. शाळा या सर्व साधारण आश्रमच होत्या. गुरूच्या हाताखाली पुर्णपणे शिष्य असत. सतत २४ तास गुरूच्या सहवासामुळे गुरूला

त्याच्या सर्व पार्श्वभूमीची माहिती असे. त्यामुळे त्याला त्याच्या कुवतीप्रमाणे शिक्षण देणे शक्य होई. इथे पालकांची कोणत्याही प्रकारची आपली मते मुलांच्यावर लादण्याचा प्रश्नच येत नसे. पालकांचा पूर्ण विश्वास गुरूप्रती असे आणि त्यामुळे शिष्यालाही गुरूविषयी आदर वाटे विद्यार्थ्याच्या आज्ञाधारकपणामुळे गुरू, शिष्य, व पालक या तिघात सौहादपूर्ण संबंध प्रस्थापित होत होते.

आज पूर्वीच्या तुलनेत शाळेचे कामकाज घडयाळी सहातास चालते. त्यामुळे विद्यार्थी शाळेत सहा तास आणि घरी अठरातास पालकांच्या सहकवासांत असतो. मुलांच्यावर जे काही सुसंस्कार करावयाचे आहेत ते सर्व शाळेनेच करावेत अशी पालकांची इच्छा असते. पण यातील मर्यादा लक्षात घेतल्या जात नाहीत. काही पालकांना एकदा मुलाला शाळेत घातले की आपले कर्तव्य संपले असेही वाटते. सर्व शैक्षणिक सुविधा दिल्या म्हणजे जबाबदारी पूर्ण झाली असे वाटते. मात्र काही गोष्टी समजून घेणे गरजेचे आहे.

परंतू आज पूर्णतः परिस्थिती बदलेली दिसते कारण जेव्हा आपल्याला अशी बिघडलेली, वाट चुकलेली, व्यसनी, वाया गेलेली मुले पहावयास मिळतात तेव्हा पालकाच्या तोंडात ही अशी मुले नसती तर बरे झाले असते असे दुःखद उद्‌गार ऐकावयास मिळतात. अर्थात या उशिरा कळलेल्या गोष्टी आहेत.

घर, समाज व शाळा एकत्र आले तरच विद्‌यार्थ्याचा सर्वांगिण विकास साधणे शक्य आहे. त्याचमुळे शिक्षक आणि पालक बालकांच्या सर्वांगिण विकासासाठी एकत्र येणे गरजेचे आहे. त्याबरोबर त्यांचे संबंध वाढणे गरजेचे आहे. वर्तमान स्थितीतील शाळांमधील शिक्षण प्रकियेत बदल घडवून आणणे गरजेचे आहे.

हा बदल पालक–शिक्षक संघाच्या माध्यमातूनच होऊ शकतो. विद्यार्थ्याच्यात शिस्तबध्दता तसेच पालक शिक्षकांच्यातील मैत्रीपूर्ण वातावरण तयार करण्यासाठी पालक शिक्षक संघच मुख्य भूमिका करू शकतो व अनुकूल वातावरण निर्माण होऊ शकते.

पालक शिक्षक संघाच्या माध्यमातून समाजाचा सक्रिय सहभाग विद्यार्थ्यांच्या शाळेच्या प्रगती करिता मिळवता येतो बालकांच्या व्यक्तिमत्व विकासामध्ये शिक्षक शाळा आणि समाज यांच्या बरोबरच पालकांची भूमिका अत्यंत महत्वाची असते. त्यामुळे शिक्षण प्रक्रियेला पूरक असणाऱ्या 'पालक' या महत्वाच्या घटकास जाणून घ्यायला हवे. विद्यार्थ्याच्या व्यापक हितासाठी त्यांच्याशी सुसंवाद साधायाला हवा, त्यामुळे विद्यार्थ्याचा सर्वांगिण विकास साधणे सुकर होईल. पालक आणि शिक्षक या दोघांच्या समोर विद्यार्थ्यांचा सर्वांगिण विकास हे एकच उद्दिष्ट असते. यासाठी पालक शिक्षक सुसंवादाची व पालकांच्या उत्स्फूर्त सहकार्यांची गरज असते.

नव्याने येणाऱ्या बालकांना पालक मोठया विश्वासाने शिक्षकांकडे सोपवून त्यांच्या विकासाबद्दल निर्श्चित होतात. पालकांचे बोट सोडून शाळेत दाखल झालेली मुले शिक्षकांचे प्रेम मिळतातच मोकळेपणाने बोलू लागतात, एकमेकांच्यात मिसळू लागतात. आधारासाठी शिक्षकांचे बोट पकडतात आणि त्यामुळेच त्यांचे पालकत्व आपोआपच शिक्षकांच्याकडे येते. मुलांच्या विकासाच्या मार्गातील विविध अडथळे दूर करण्यासाठी शिक्षक पालक संबंध दृढ व्हायला हवेत, आपुलकीने जपायला हवेत.

शिक्षक देखील समाजाचा एक घटक आहे या नात्याने पालकांशी

हितगूज करताना विद्यार्थ्याच्या विकासाबरोबरच समाजाची उन्नती होऊ शकते. म्हणूनच पालक –शिक्षक संघाची गरज जाणून घेणे महत्वाचे ठरते. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकास एका निश्चित दिशेने होण्यासाठी शाळा घरात पोहचली पाहिजे आणि घर शाळेत प्रकटले पाहिजे, शाळेतील आणि घरातील शिक्षण यांचा सुरेख मेळ बसण्यासाठी पालक शिक्षक संबध जिव्हाळयाचे आणि निकोप असले पहिजेत.

शाळेतील वातावरण कौटुंबिक जिव्हाळाचे असले पाहिजेत तसेच घरात सुध्दा शाळेत दिल्या जाणाऱ्या सुसंस्काराना पोषक असे वातावरण असायला पाहिजे. पालक शिक्षक संघांच्या निर्मितीमुळे आणि सहकार्याने शाळांच्या कामकाजात सुधारणा होण्यास मदत होते. शाळा आपली आहे. शाळेच्या प्रगतीसाठी सर्वतोपरी सहकार्य करणे ही आपले कर्तव्य आहे. अशी भावना समाजात रूजविल्या शिवाय शासनाच्या प्रयत्नांना समाजाची जोड मिळू शकणार नाही. त्या साठी शाळेच्या उद्दिष्टाबाबत जाणीव जागृती, आपुलकी, सहकार्य व सहभाग व कर्तव्य आणि जबाबदारीची भावना समजामध्ये निर्माण करायची गरज आहे. या करिता शाळेचा सातत्याने समाजाशी संपर्क साधण्याचा प्रयत्न झाला पाहिजे. समाज व समाजातील मनुष्य बळ, समाजाच्या चालिरिती व त्यांचे उत्सव यांची माहिती मिळवून योग्य तेथे समाजात मिसळून त्यांच्या मनात शाळेबद्दल प्रेम निर्माण केले पाहिजे. तसेच समाजाकरिता उपयोगी उपक्रम देखील शाळांनी घेतले पाहिजे. शाळेत आवश्यक सुविधा प्राप्त करून देण्यासाठी व हाती घेतलेले उपक्रम यशस्वी होण्यासाठी पालकांचे सहकार्य मोलाचे ठरू शकते. बालकांच्या सर्वांगीण विकासाकडे पालकांचे अनेक कारणामुळे दुर्लक्ष होते एकत्रित कुटूंब पध्दती नाहिशी होत असून तिची जागा छोटी कुटूंबे घेत

आहेत. छोटया कुटूंबातील आई–वडिल दोघेही कामाच्या निमित्ताने दिवसाचा बराच काळ घराबाहेर असतात. मुले अतिशय कमी वेळ पालकांच्या सहवासात असतात. आणि या मिळालेल्या वेळेतही पालक आपल्या पाल्यांच्या विकासाकडे पुरेसे लक्ष देऊ शकत नाही. पालकांनी मुलांच्या शिक्षणासाठी केवळ पैसे खर्च करून भागणार नाही तर त्यांनी पाल्यासाठी आपल्या वेळ ही देणेही अत्यंत गरजेचे आहे. हे पालकांच्या मनावर ठसविले पाहिजे.

बऱ्याचदा काही पालकांच्या अवास्तव अपेक्षांमुळे मुलांच्या मनावर अकारण ताण निर्माण होण्याची शक्यता असते. प्रत्येक विषयांत प्रत्येक विद्यार्थ्याची गती सारखी नसते त्यामुळे आपल्या पाल्यांच्या प्रगतीची अन्य विद्यार्थ्यांच्या प्रगतीशी स्पर्धात्मक दृष्टीने तुलना करू नये. अन्यथा अशा मानसिक ताणाचा मुलांच्या शारिरीक आणि बौध्दीक विकासावर विपरित परिणाम होऊ शकतो. ही बाब पालकांच्या निदर्शनास आणण्याची आवश्यकता आहे.

शिक्षक हा पालकही असल्याने भेडसावणाऱ्या शालेय, सामाजिक, कौटुंबिक अशा विविध समस्यांची जाणीव असते. यासाठी समस्यांची उकल होऊन त्यावर योग्य उपाय योजना करण्यासाठी पालक शिक्षक संपर्काशिवाय दुसरा पर्याय नसावा. विद्यार्थ्यांच्या भवितव्याची पालकां इतकीच किंबहुना अधिक आस्था व कळकळ आपल्यालाही आहे. हे सततच्या संपर्काने शिक्षकही पालकांच्या लक्ष्यात आणून देऊ शकतो. आणि त्याच मुळे पालक व शिक्षक यांच्यामध्ये भावनिक स्तरावर एक उदात्त दुवा निर्माण होऊन विद्यार्थी घडविण्यात पालकांचे सहकार्य पूर्णपणे मिळू शकेल.

पालक शिक्षक संपर्काचा उपयोग विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक गुणवत्तेबरोबर सर्वांगीण विकासासाठी उपयोग होईलच त्याच बरोबर पालक संपर्कामुळे त्यांच्यातील सौहादपूर्ण नात्याने शिक्षक व्यवसायांची समाजामानसातील प्रतिमा अधिकच उंचाविण्यास निश्चित मदत होते.

## १.२ समस्या विधान :

प्रस्तुत समस्यचे विधान खालील प्रमाणे:

पालक शिक्षक संघाच्या कार्याचा माध्यमिक शाळेतील

विद्यार्थ्यांच्यावर होणारा प्रभाव

एक अभ्यास –

## १.३ पारिभाषिक शब्दांच्या व्याख्या :

संशोधन हे एक शास्त्रीय अभ्यास कार्य आहे. कोणत्याही विषयाचा शास्त्रशुध्द अभ्यास करताना, संज्ञा एका विशिष्ट अर्थानेच वापराव्या लागतात. आणि संशोधन विषय अधिक स्पष्ट व्हावा. या हेतूने संशोधन समस्येच्या वरील विधानात वापरलेल्या महत्वाच्या संज्ञा किंवा पारिभाषिक कार्यात्मक शब्दांच्या व्याख्या पुढील प्रमाणे केल्या आहेत.

**पालक–शिक्षक संघ :**

**कार्यात्मक व्याख्या:**

कराड शहरातील मराठी माध्यमाच्या शाळेतील विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक,शारिरीक, मानसिक व सामाजिक विकासाच्या उद्दिष्टाने एकत्र आलेला पालक व शिक्षकांचा समुह.माध्यमिक शाळेतील विद्यार्थी कराड शहरातील मराठी

माध्यमाच्या शाळेत शिकणारे इयत्ता ९ वी व १० वी चे विद्‌यार्थी सन, २००४-२००५. मध्ये अध्ययन करणारे विद्यार्थी

**प्रभाव :**

**कार्यात्मक व्याख्या**

पालक शिक्षक संघांच्या कार्यामुळे मराठी माध्यमाच्या माध्यमिक शाळेतील विद्‌यार्थ्यांच्या इयत्ता ९ वी १० वी शैक्षणिक, शारिरीक मानसिक व सामाजिक बाबींवर होणारा अनुकूल बदल

**एक अभ्यास**

**कार्यात्मक व्याख्या**

समस्येचा काळाजीपुर्वक शोध : प्रस्तुत संशोधनाच्या संदर्भात एक अभ्यास म्हणजे पालक शिक्षक संघाच्या कार्यातून माध्यमिक शाळेतील विद्‌र्यार्थ्यांच्यामधील शैक्षणिक, शारिरीक, मानसिक व सामाजिक दृष्टीकोनातून होत असलेला अनकुल बदलचा शोध म्हणजे एक अभ्यास.

## १.४ संशोधनाची गृहितके :

प्रस्तुत संशोधनासाठीची गृहितके पुढील प्रमाणे –

१) माध्यमिक शाळेतील विद्‌र्यार्थ्यांच्यामध्ये येणाऱ्या शैक्षणिक, शारिरीक, मानसिक व सामाजिक समस्यांची माहिती पालक शिक्षक संघास आहे.

२) पालक शिक्षक संघाच्या माध्यमातून माध्यमिक शाळेतील विद्‌यार्थ्यांचा विकास होऊ शकतो याची जाणीव पालक शिक्षक संघास आहे. पालक शिक्षक संघ

सद्यःस्थिती मध्ये विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक विकासाबरोबर सामाजिक विकासातही मोलाची भर घालू शकतो.

## १.५ संशोधनाची उद्दिष्टये :

प्रस्तूत संशोधनाची उद्दिष्टे खालील प्रमाणे आहेत.

१) माध्यमिक शाळेतील पालक शिक्षक संघाच्या सध्यःस्थितीचा आढावा घेणे.

२) पालक शिक्षक संघाच्या माध्यमातून माध्यमिक शाळातील शैक्षणिक शारिरीक, मानसिक, व सामाजिक समस्य प्रधान विद्यार्थ्यांचा शोध घेणे.

३) शैक्षणिक समस्या असलेल्या विद्यार्थ्यांच्या संदर्भात पालक शिक्षक संघाने केलेल्या कृतीचा अभ्यास करणे.

४) सामाजिक समस्या असलेल्या विद्र्यार्थ्यांच्या संदर्भात पालक शिक्षक संघाच्या कृतीचा अभ्यास करणे.

५) पालक शिक्षक संघ अहवाल, विविध शिबीरांच्या अहवालावरून माध्यमिक शाळेतील विद्यार्थ्यांच्या शारिरीक व मानसिक वाढीसंदर्भात पालक शिक्षक संघाच्या भूमिकेचा अभ्यास करणे.

६) पालक शिक्षक संघाच्या मार्फत माध्यमिक शाळेतील विद्यार्थ्यांना मिळाणाऱ्या व्यवसाय मार्गदर्शनासंबंधी भूमिका तपासणे.

७) प्रस्तूत संशोधन निष्कार्षाच्या आधारे पालक संघांस योग्य त्या सूचना देणे.

## १.६ संशोधनाचे महत्व :

संशोधन हे समस्या सोडविण्याचे व दैनंदिन जीवन समृध्द बनविण्याचे प्रभावी साधन आहे. शिक्षकांना व पालकांना विद्यार्थ्यांच्या संदर्भात दररोज

अनेक नवीन समस्यांना तोंड दयावे लागते. उदा. शैक्षणिक समस्यांच्या बाबतीत प्रामुख्याने अध्ययन करतांना येणाऱ्या विविध समस्या, शारिरीक समस्या : यात अपंगत्व , कुपोषण, दृष्टीदोष त्याचा अध्यनावर होणारा परिणाम, सामाजिक समस्या : विद्यार्थ्यांना येणाऱ्या समायोजनाच्या समस्या तसेच त्यांच्यात सामाजिक व कौटूंबिक पार्श्वभूमीवर निर्माण होणाऱ्या विद्यार्थ्यांच्या बाबतील समस्या, मानसिक समस्या : मानसिक ताण तणाव त्यांचा अध्यनावर होणारा परिणाम इत्यादी समस्या पालक व शिक्षक यांना भेडसावतात. विद्यार्थी हा पालक व शिक्षक यांच्या सानिध्यात अधिक काळ असतो म्हणून या दोघांनाही त्यांच्या विकासासासाठी प्रयत्न करणे गरजेचे असते. त्यासाठी त्यांनी एकत्रित येणे आवश्यक आहे. या पार्श्वभूमीवर पालक शिक्षक, संघांची भूमीका महत्वाची ठरते. तसेच सद्यःस्थितीत विद्यार्थी विकासात पालक शिक्षक संध कोणती भूमीका पार पाडत आहे हे पहाणे महत्वाचे ठरते. म्हणूनच सद्यःसंशोधन महत्वाचे आहे.

## १.७ **संशोधनाच्या मर्यादा :**

प्रस्तूत संशोधनाच्या मर्यादा पुढील प्रमाणे –

१) प्रस्तूत संशोधन हे कराड शहरातील २००४-०५ मध्ये मराठी माध्यमाच्या इयत्ता ९ वी १० मध्ये शिकणारे विद्यार्थी, त्यांचे पालक, शिक्षक व मुख्याध्यापक यांच्या पुरते मर्यादित आहे.

२) प्रस्तूत संशोधनामध्ये कराड शहरातील मराठी माध्यमिक शाळेत शिकणाऱ्या इयत्ता ९ वी १० वीच्या विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक शारिरीक, मानसिक व सामाजिक समस्ये बाबत होणाऱ्या प्रभावापुरते मर्यादित आहे.

## १.८ संशोधनाची कार्यपध्दती :

प्रस्तुत संशोधन करतांना संशोधिकेने जो विषय निवडला आहे. त्या संबंधात विविध प्रकारची माहिती गोळा करावी लागते, संबंधित संशोधन हे वर्तमान परिस्थितीशी निगडीत असल्याने संशोधिकीने सर्वेक्षण पध्दतीची निवड केलेली आहे. त्यानुसार माहितीची संकलन करण्यात आले.

## १.९ प्रकरणीकरण :

संशोधनासाठीची कार्यपध्दती साधनाच्या सहाय्याने एकत्रीत केलेली माहिती त्यांचे वर्गीकरण विश्लेषण निष्कर्ष व शिफारशी यांचे सादरीकरण खालील प्रकरणामध्ये केलेले आहे.

**प्रकरण – १ प्रास्ताविक –**

या प्रकरणामध्ये प्रस्तावना समस्या विधान, पारिभाषिक शब्दांच्या व्याख्या, संशोधनांची उद्दिष्टे, मर्यादा, गृहितके, महत्व,इ. बाबींचा उल्लेख केला आहे.

**प्रकरण २. पालक शिक्षक संघाची कार्यपध्दती.**

या प्रकरणामध्ये पालक शिक्षक संघांची प्रत्येक शाळेमध्ये राबविण्यात येत असलेली पध्दती शासनाचा आदेश, त्यानुसार एकूण पालक सभा इत्यादी बाबींचा उल्लेख आला आहे.

**प्रकरण ३. संबंधीत साहित्याचा आढावा.**

या प्रकरणामध्ये संशोधन विषयांच्या संदर्भात पुर्वी केलेल्या संशोधन कार्याचा विचार केला आहे.

**प्रकरण ४ संशोधनाची कार्यपध्दती.**

या प्रकरणामध्ये सर्वेक्षण संशोधन पध्दती संशोधनाची मुलाखत प्रश्नावली, पालक शिक्षक संघाचे अहवाल, नोंद वही (पुस्तक) नमुना निवड, माहितीचे वर्गीकरण विशेष विश्लेषण इत्यादी बाबत माहिती दिली आहे.

**प्रकरण ५ संशोधन सामग्रीचे विश्लेषण व अर्थनिर्वचन**

या प्रकरणामध्ये मुलाखत व प्रश्नावरली नोंद पुस्तक या साधनांद्वारा प्राप्त माहितीचे वर्गीकरण विश्लेषण व अर्थ निर्वचन केले आहे.

**प्रकरण ६ निष्कर्ष व शिफारशी.**

या प्रकरणामध्ये संकलित माहितीच्या आधारे वर्गीकरण विश्लेषण व अर्थ निर्वचनातून निष्कर्ष काढले आहेत. निष्कर्षाच्या आधारावरच शिफारशी सुचविल्या आहेत. शेवटी संशोधन विषयांच्या संदर्भात आणखी विस्तृत संशोधनासाठी जादा सूचनाही दिल्या आहेत.

## १.१० समारोप :

सदर प्रकरणामध्ये प्रस्तावना, समस्या विधान, पारिभाषिक शब्दांच्या व्याख्या, संशोधनांची उद्दिष्टे, संशोधनांच्या मर्यादा संशोधनांची गृहितके, संशोधनांचे महत्व, आणि प्रकरणीकरण इत्यादी बाबी पाहिल्या. पुढील प्रकरणात पालक शिक्षक संघांची कार्यपध्दती कोणत्या प्रकारची असते याची माहिती करून घेणार आहोत

# प्रकरण दुसरे
# पालक शिक्षक संघाची कार्यपध्दती

## २.१ प्रस्तावना

एक सुजाण नागरिक घडविण्यासाठी विद्यार्थ्यांच्यावर प्रभाव करणारे घटक कोणती महत्वाची भूमिका बजावत असतात? यात विद्यार्थ्यावर शाळा व शाळेतील व शाळेभोवतालचीही घटक तसेच कुटूंबातील व घराभोवतीचे वातावरण या गोष्टी कारणीभूत असतात. मात्र पालक व शिक्षक यांच्यामध्ये सलोख्याचे व निकोप नाते राहिल्यास विद्यार्थी घडवताना शिक्षकासही कमी अडचणीना तोंड दयावे लागेल. अन् पालकांसही त्यांच्या जबाबदारीची जाणीव होते. यांचं एक उदात्त विचारातून पालक शिक्षक संघाची स्थापना झाली.

ग्रामीण भागात तसेच शहरी भागातही पालक म्हणावी तितकी जबाबदारीची भूमिका घेताना दिसत नाहीत. मात्र पालक शिक्षक संघाच्या निर्मिती मुळे कधीही न येणारे पालक आज शाळेत जाताना दिसतात.

## २.२ पालक शिक्षक संघांची पार्श्वभूमी :

पालक शिक्षक संघ हा कायदेशीररित्या अस्तित्वात १९९७ मध्ये तत्पूर्वी पालक हा शाळेमध्ये क्वचित प्रसंगी जात असे. आज प्रत्येक शाळेमध्ये पालक शिक्षक संघ अस्तित्वात आहे. शासन निर्णय क्रमांक एस्.एस्.एन २६९६ (६२२/९६) मंत्रालय विस्तार भवन, मुंबई –४०० ०३२. शालेय शिक्षण विभाग दिनांक १६ मे, १९९६ अन्वये राज्यातील प्रत्येक मान्यता प्राप्त माध्यमिक शाळेत पालक शिक्षक संघाची स्थापना अनिवार्य करण्यात यावी असे आदेश नियमित करण्यात आले आहेत. सदर आदेश

प्राथमिक शाळांसाठी ही लागू करण्यात यावी असा शासाने आत्ता निर्णय घेतला आहे. वरील आदेश दिनांक १८ ऑक्टोंबर, १९९७ रोजी जारी करण्यात आला (परिशिष्ट '**अ**' ) मध्ये आदेशाची प्रत जोडण्यात आली आहे.

## २.३ पालक शिक्षक संघाचे शाळेतील स्वरूप :

पालक शिक्षक संघांच्या स्वरूपाविषयी शासनाच्या आदेशान्वये स्वरूपही स्पष्ट करण्यात आले आहे. पालक शिक्षक संघाची रचना व कर्तव्य या बाबत शिफारशी करण्यासाठी शिक्षक संचालक महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी एक समिती गठीत केली होती. सदर समितीने केलेल्या सूचना शिफारशी विचारात घेवून पालक, पालक शिक्षक संघाची रचना कशी असावीत व कर्तव्य काय असावीत हे ठरविले आहे. त्या नुसार आज प्रत्येक शाळेमध्ये जून महिन्याच्या अखेरीस या पालक शिक्षक संघाची स्थापना शाळेत होते. यात प्रत्येक तुकडीस एक पालक सदस्य व एक शिक्षक सदस्य असून मुख्याध्यापक अध्यक्ष असतो. अशा प्रकारची कार्यकारी समिती स्थापन केली जाते.

## २.४ पालक शिक्षक संघाची कार्यपध्दती :

पालक शिक्षक संघाची प्रत्येक वर्षी जून मध्ये स्थापना नव्याने केली जाते. या पालक शिक्षक संघाचे अध्यक्ष मुख्याध्यापक असतात. तसेच प्रत्येक तुकडीसाठी एक पालक अर्थात जेवढया तुकडया तेवढे पालक सदस्य असतात. प्रत्येक वर्गात एक या प्रमाणे शिक्षक सदस्यांची नियुक्ती केली जाते. या मध्ये पंन्नास टक्के मागासवर्गीय किंवा पंन्नास टक्के महिला सदस्य असाव्यात असा नियम आहे. संघाच्या माध्यमातून वर्षातून किमान चार वेळा व अत्यावश्यक असेल त्यावेळीही बैठका घेण्यात येतात.

सदर संघाच्या बैठकामधून शाळेमधील अभ्यासक्रम नियोजनानुसार होतो का हे पाहिले जाते. अभ्यासामध्ये कमी असलेल्या विद्यार्थ्यांसाठी अधिक प्रयत्न करण्यास योजना सुचविल्या जातात. अभ्यास पुरक कार्यक्रमात शाळेला सहाय्य करणे व सह शालेय उपक्रमांना मान्यता देणे किंवा विनाअनुदानीत शाळेमधील शैक्षणिक शुल्क, सत्र फी, व शालेय उपक्रमासाठी आकारण्यात येणाऱ्या शुल्कासंबंधी माहिती घेवून नोंद करणे अशी प्रमुख कार्य केली जातात. पालक शिक्षक संघाचा मुळ उद्देश विद्यार्थी व शिक्षक यांच्या समस्या सोडविणे असून त्यांनी शाळेच्या दैनंदिन कामकाजात तसेच प्रशासनात लक्ष्य घालणे अपेक्षित नसते. अशा प्रकारे पालक शिक्षक संघाच्या वर्षभर वरील कर्तव्य पूर्ण करण्याच्या दृष्टीने कार्य केले जाते. वर्षभरातील बैठकीमधून विद्यार्थी व शिक्षकांच्या समस्या सोडवल्या जातात.

## २.५ पालक शिक्षक संघापासून शिक्षकांना होणारे फायदे :

- पालक शिक्षक संघाचे बैठकीमुळे पालकांचे शाळेशी असणारे संबंध वाढतात
- शिक्षकांच्या अडचणी पालकांना कळू शकतात.
- विद्यार्थ्यांच्या प्रगती बाबतची चर्चा पालकांशी करता येते.
- शिक्षकांच्या विषयी पालकांच्या मनात आपुलकीची भावना निर्माण होते. व ते प्रगतीस असणाऱ्या विविध कार्यक्रमामध्ये कृतीशील सहभाग होऊन विद्यार्थ्यांच्या विकासासाठी प्रयत्न करतात.
- विद्यार्थ्यास जाणवणाऱ्या विविध समस्ये विषयी पालकांशी मुक्तपणे शिक्षकांना बोलता येते. त्यांचे निराकरण करून शैक्षणिक प्रगती साधण्यासाठी दोघेही मदत करू शकताता. (पी.टी.ए. २००४)

## २.६ पालक शिक्षक संघापासून पालकांना होणारे फायदे :

- पालक शिक्षक संघाच्या बैठकांना हजर राहिल्याने शाळेची व विद्यार्थिंची प्रगती कळू शकते.
- पालक आपल्या अडचणी शिक्षकांना सांगू शकतात.
- आपल्या पाल्यांची प्रगती व कुवत पालकांना लक्षात येवू शकते.
- आपल्या पाल्यास मिळणाऱ्या शैक्षणिक सुविधा व असुविधा पालकांना समजू शकतात.

## २.७ पालक शिक्षक संघापासून विद्यार्थ्यांना होणारे फायदे :

- पालक शिक्षक संघामुळे विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी शिक्षक पालक संघ प्रयत्नशील राहतो.
- विद्यार्थ्यांच्या सामाजिक पार्श्वभूमी विषयक समस्या शिक्षकांना समजू शकतात.
- शिक्षकांविषयी भीती कमी होण्यास मदत होते.
- एखदया विषयाची आवड नसेल व ती माहिती शिक्षकांना कळाली तर त्याविषयी अभिरूचि वाढविण्याकरिता शिक्षक प्रयत्नशील राहू शकतो.
- पालक व शिक्षक यांच्या संपर्कातून विद्यार्थ्यांच्या सुप्तगुणांना प्रकट करण्यासाठी प्रोत्साहन मिळते.
- विद्यार्थ्यांच्या आरोग्यविषयक तक्रारीचे निवारण होण्यास मदत होते.

- शालेय उपकम व अभ्यासेतर उपक्रमांत विद्यार्थ्यांचा सहभाग वाढण्यासाठी पालक शिक्षक संघाची मदत होते.

## २.८ पालक शिक्षक संघापासून शाळेला होणारे फायदे :

- १९८६ च्या शैक्षणिक धोरणानुसार विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास साद्य होण्याचे ध्येय पालक शिक्षक संघाच्या मदतीने होऊ शकते.
- पालकांच्या शाळेशी असणारा संपर्क वाढतो. त्यामुळे पालकांना शाळेच्या विकासाबाबत माहिती मिळते.
- पालकांच्या सहकार्यामुळे शाळेची भौतिक व शैक्षणिक प्रगती होते.
- पालकांच्या अडचणी शिक्षकांना कळतात व कांही प्रसंगी शिक्षक व शाळा देखील विद्यार्थी व पालकांच्या अडचणीत मदत करतात.
- पालक शिक्षक संघाच्या मदतीने शाळेचा समाजात लौकिक वाढतो.

(संदर्भ – शिक्षक क्षमता समृध्दी सप्टेंबर, २०००)

## २.९ पालक शिक्षक संघापासून देशाला होणारे फायदे :

- पालक शिक्षक संघाच्या मदतीने विद्यार्थ्यास एक सुजाण व जबाबदार नागरिक बनविण्याचे उद्दिष्ट साध्य होऊ शकते.
- पालक शिक्षक संघाच्या मदतीने विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक, सामाजिक, मानसिक, शारिरीक समस्यांचे निराकरण होते. त्यामुळे भावीपिढी सुदृढ, संस्कारीक होते.

## २.१० पालक शिक्षक संघाच्या मर्यादा :

- पालक शिक्षक संशोधनामध्ये पालक म्हणून एका तुकडीसाठी एकच सदस्याची नोंद केली जाते. त्यामुळे सर्व पालकांना समान संधी मिळत नाही.
- पालकांचा शाळेशी असणारा संबंध वाढल्याने पालकांचा शालेय कामकाजात व्यत्यय होण्याचा शक्यता असते. उदा. शालेय अध्यापनाच्यावेळी पालकांचे शाळेस भेट.
- पालक शिक्षकांच्या बैठका हया केवळ वर्षभरातून चार वेळा होतात, त्यांचे प्रमाणे अतिशय अल्प आहे, त्या अधिक होणे गरजेचे आहे.
- पालकांच्या सहकार्यामुळे शिक्षकांना, प्रसंगी शाळेला पालकांच्या मागण्या मान्य कराव्या लागतात.

## २.११ समारोप –

सदर प्रकरणामध्ये पालक शिक्षक संघाची पार्श्वभूमी, पालक शिक्षक संघ, पालक शिक्षक संघापासून विद्यार्थ्यांना, शिक्षकांना, पालकांना, शाळेला, तसेच देशास होणारे फायदे इत्यादी फायदे पाहिले. पालक शिक्षक संघाचे, स्वरूप कार्यपध्दती व मर्यादा पाहिल्या.

पुढील प्रकरणामध्ये संबंधित संशोधन साहित्याच्या आढाव्याची माहिती दिली आहे.

# प्रकरण ३ रे
# संबंधित साहित्याचा आढावा

**प्रस्तावना –**

यामध्ये समस्येच्या मुळाशी जाण्यासाठी या पुर्वी केलेल्या संशोधनाचा आढावा घेतला जातो. संबंधित साहित्याचे समालोचन महत्वाचे असते. त्यामुळे संशोधिकेला संशोधन तंत्र, साधणे, यांची निश्चित कल्पना येते. या संबंधी Whitney आपल्या 'The Element of Research' या ग्रंथात म्हणतो.

"The student find analyse and evaluate crtically every pertainent search report dealing with his choosen problem. Anything less than this will be neither sensible nor scientific"

The review of the lites ture promoters a greater understanding of the problems and it's cruciel aspects and ensure the ausidance at necessary dupliclation. It also provides comparative data on the bases of which to evaluate and interprets the significance of ones findings. In addition if contributes to the scholarship of the investigator. No experienced researcher, would think of

understanding a study without acquainthing himself with the contribution of previous investigators.

**संबंधित साहित्याच्या समालोचनाची उद्दिष्टे** :

१. निवडलेल्या विषयासंबंधी पुर्ण झालेल्या संशोधनाची कल्पना प्राप्त करून त्याची पुनारावृत्ती टाळणे व संशोधन विषय निवडण्यास योग्य मार्गदर्शन मिळविणे.

२. संशोधन विषयासंबंधी सिध्दांत व गृहितकृत्ये त्यांच्या मांडणीबद्दल निश्चित कल्पना प्राप्त करून घेणे.

३. आधार सामुग्री व निष्कर्ष या विषयी तुलनात्मक माहिती मिळविणे.

४. समर्पक सांख्यिकी तंत्रे व त्याचा उपयोग या संदर्भात माहिती मिळवणे.

## ३.२ संशोधनाशी संबंधीत साहित्याचा आढावा :

संशोधिकेने संशोधन विषयांशी निगडीत जो साहित्याचा आढावा घेतला आहे तो पुढील प्रमाणे. तीन विभागात मांडला आहे.

### अ) संशोधनाशी संबंधी देशांतर्गत झालेल्या संशोधनाचा आढावा.

या ठिकाणी प्रस्तूत संशोधनाशी संबंधीत झालेली देशांतर्गत झालेली संशोधन व संशोधनाद्वारे आलेली निष्कर्ष यांचा थोडक्यात घेतलेला आढावा घेतलेला आहे.

**पंत वाय.आर. – (पी.एच.डी. १९८४)**

. 'शिक्षणातील पालकाचा सहभाग – नेपाळमधील खेडयातील सामुहिक, वैयक्तिक, सामाजिक सहभागाचा अभ्यास

**संशोधनाची उद्दिष्टे –**

१) ऐतिहासिक दृष्टीचा व पर्यावरणाच्या बैठकींचा समाजातील शिक्षणात सहभाग पहाणे.

२) समाजाचा अनौपचारिक कृतितील सहभाग, तसेच शिक्षणातील विकासामध्ये समाजाचा व स्थानिक शालेय कार्यक्रमातील सहभाग जाणून घेणे.

३) खेडयातील समाजाचा, शाळेच्या जडण–घडणातील सहभाग पहाणे.

४) शैक्षणिक समाजामध्ये नमुना आणि कार्य हे श्रमाच्या योग्य मोबदल्यात असले

५) सहभागी लोकांचा शिक्षणासंबंधी विचार आणि कार्यातील प्रभाव.

६) शैक्षणिक कार्यात विविध प्रकारे लोकांचा सहभाग

७) लोकांचा प्रतिसाद आणि स्थानिक स्थरावरील शिक्षणांचा सहभाग.

८) सामाजिक, वैयक्तिक,घटकांचा शिक्षणातील सहभागाशी असणारा संबंध तासणे.

**निष्कर्ष :**

१. या सहभागी संस्थाच्या आराखडयामध्ये सर्व स्तरावरील लोकांच्या सहभागाला संबधी दिलेली दिसून आली नाही. या आराखडयातील सहभागी वैचारिक संधीची उपलब्धता तसेच त्यांच्या देवाण घेवाण दिसून आली नाही. केवळ श्रम व पैसा यांचे दळण वळण झालेले दिसून येते. तेथे लोकांच्या मताची शक्ती कमी दिसून आली.

२. गरीब व अशिक्षित लोकांना शैक्षणिक सुविधांचा फायदा कमी प्रमाणात मिळतो. शैक्षणिक संस्थांच्या कार्यक्रमाबाबत स्थानिक स्तरावर दुसरा पर्याय दिसून आला नाही. गरीब मुलांना घगुती कामातून शालेय शिक्षणास वेळ मिळत नाही. मिळाला नाही. सामाजिक वैयक्तिक, घटकांच्या प्रभावाचा संबंध शैक्षणिक पात्रता समाजातील स्थान आणि जमीनधारक यात दिसतो.

३ जास्तीत जास्त स्थानिक स्तरावर असणाऱ्या लोकांचा सहभाग शैक्षणिक सुविधामध्ये सहभाग दिसतो शिवाय भूविरहित व गरीब समाजातील लोकांना सहभाग दिसून येतो. हा आर्थिक स्वरूपाचा सहभाग नसून तो श्रमाचा मोबदल्यात विविध सुधारणा पुरविण्याच्या संधीची उपलब्धता करताना दिसतात.

४. स्थानिक स्तरावरील लोकाच्या निर्णय घेण्यात आणि शैक्षणिक सुविधाच्या उपयुक्तेबाबत कमी जास्त प्रमाणात सहभागाचे चित्र दिसते.तथापि जास्तीत जास्त सहभागी 'तराई' भागात शैक्षणिक सुविधांचा अधिक फायदा झालेला दिसतो. पण हे आर्थिक स्थितीशी संबंधित असून, शैक्षणिक कार्यक्रमांच्या आराखडयाशी निगडीत आहेत.

५. सर्वसाधारण लोक हे खेडयातील समाजातील असल्यामुळे विविध शाळेतील शाळेच्या व्यवस्थापनाच्या परिणामास सहमत आहेत.

**फरझम ए. के. (पी.एच.डी. १९७९ )**

पालकांच्या व्यवसाय मुल्याधारित आणि नोकरीस प्राध्यान्य असलेल्या आणि मार्गदर्शनाशिवाय असलेल्या शाळेतील विद्यार्थ्यांचा अभ्यास करणे.

**कार्यपध्दती :**

इरफान येथील नोकरी संदर्भात मार्गदर्शन व मार्गदर्शनाशिवाय चालणाऱ्या शाळेमधील असणाऱ्या विद्यार्थ्यांच्या पालकांचा व्यवसाय सामाजिक, आर्थिक, कुटूंबाची स्थिती तसेच पालकांची मुल्याधारित शिक्षण याचा प्रभाव नोकरी शोधताना कोणत्या विद्यार्थ्यांमध्ये अधिक जाणवतो या शोधांचा अभ्यास करणे.

अभ्यासासाठी प्रातिनिधिक नमुन्यादाखल एकूण ४०५ विद्यार्थी १५२ पालक, ११२ मार्गदर्शनपर शालेतील व इतर शालेतील ७८ विद्यार्थी , ३० पालकापैकी २७ पालक मार्गदर्शनाशिवाय असणाऱ्या शाळेतील घेण्यात आले. नोकरीस प्राधान्य आणि नोकरीची आवड असणाऱ्यांची प्रश्नावली जी मार्गदर्शन नियोजन शिक्षण मंडळ इराण्यांनी तयार केलेली होती. त्या एकत्रित करून चाचणीद्वारे मुल्याधारित पालक आणि त्यांची मुले यांचा शोध घेवून फरक पाहिला.

## निष्कर्ष

१. पालकांची मुल्याधारित कल्पना विद्यार्थ्यांच्या मुल्याधारणावर प्रभाव करू शकत नाही.

२. नोकरीस प्राध्यान्य देऊन मार्गदर्शन करणाऱ्या शाळेतील विद्यार्थ्यांवर केवळ मालकांच्या मुल्याधारणेचा प्रभाव पडतो.

३. विद्यार्थ्यांच्या मुल्याधारणेचा प्रभाव त्याचा व्यवसाय प्राधान्यात दिसून येतो.

४. पालकांचा व्यवसाय आणि कौटूंबिक,सामाजिक, आर्थिक स्थितीचा परिणाम मुलांच्या नोकरीच्या प्राधान्यात दिसून येतो.

५. पालक तसेच मार्गदर्शनपर समुहांचे गटाचे विद्यार्थी, वैध्यकिय तंत्रज्ञान, शिक्षण नर्सिंग, आणि शिक्षण क्षेत्राशी संबंधितच व्यवसाय प्राधान्य देताना दिसतात.

६. मार्गदर्शनाशिवाय असणारा गटातील विदयार्थी धार्मिक, शिक्षण, पोलिस, व कायदयाचा व्यवसाय नोकरीकडे वळतात.

७. सैनिकी शिक्षणांच्या सर्वचशाखेत दोन्ही गटातील विद्यार्थ्यांना आवड नाही.

८. ज्या व्यवसायांत सुरक्षितता व सामाजिक स्थान आहे अशाच व्यवसायाला प्राधान्य पालक व विद्यार्थी देतानां दिसतात.

**ब) संशोधनाशी संबंधीत इतर देशात झालेल्या संशोधनाचा आढावाः**

**सुव्हीमन (पी.एच.डी. १९८५)**

"थायलॅड येथील शालेय कार्यक्रमातील सहभागाबद्दलचा असणारा पालकांच्या दृष्टीकोनाचा अभ्यास"

**उद्दिष्टे**

१. माध्यमिक शाळेतील कार्यक्रमासंबधी पालकांच्या दृष्टीकोन मोजण्यासाठी विश्वसनिय व वस्तुनिष्ठ मापन साधन पुरवले जावेत.

२. कनिष्ठ माध्यमिक माध्यमिक शाळेतील कार्यक्रमबाबतीलाही पालकांचा दृष्टीकोनाचे मापन व्हावे.

३. शहरी व ग्रामीण भागांतील पालकांच्या मधील असणारा दृष्टीकोनाचा अभ्यास करणे.

४. लिंग भेदाबद्दल असणारा पालकांच्या दृष्टीकोनाचा अभ्यास पदवीधर शिक्षण घेतलेले पालक आणि पदवीपूर्ण किंवा कमी शिक्षण घेतलेल्या पालकांच्या दृष्टीकोनामधील फरकांचा अभ्यास करणे.

५. सामाजिक प्रतिष्ठा प्राप्त व्यवसायीक आणि सामाजिक प्रतिष्ठा प्राप्त नसलेले व्यावसायीक असणारे पालक यांच्या दृष्टीकोनामधील फरकांचा अभ्यास करणे.

पृथःकरणासाठी विविध चाचण्या तयार केल्या त्यावरून दृष्टीकोन मापन केले.

SHIVAJI UNIVERSITY LIBRARY KOLHAPUR

## निष्कर्ष :

१. लिंग शिक्षण व व्यवसाय हे तीन मुख्य दृष्टीकोन मापनाचे घटक आहेत. लिंगानुसार पालकांच्या दृष्टीकोनात सहभागामध्ये विविधता दिसून येते.

२. पालक शिक्षणाचा दुसरा महत्वपूर्ण असा दृष्टीकोन विस्ताराचा बदल आहे. ज्या पालकांनी उच्च शिक्षण घेतले आहे त्यांचा कनिष्ठ माध्यमिक, माध्यमिक शाळेतील कार्यक्रमाबाबतचा दृष्टीकोन उपकारक आहे.

३. शहरी भागातील पालकांचा दृष्टीकोन हा ग्रामीण भागातील पालकांच्या तुलनेने कनिष्ठ माध्यमिक शाळेतील कार्यक्रमाबाबतचा अत्यंत उपकारक आहे.

## टॅन्ग्री. एस. आणि मोले ओ. (१९८७)

'पालक आणि समाज' या विषयांतर्गत प्रस्तूत संशोधकाने विद्यार्थ्यांची उपस्थिती, वर्तणुक, प्रवृत्ती यांच्याशी पालक आणि समजाचा असलेला संबंध या विषयीचा एक शोध निबंध प्रसिध्द केला आहे.

## फी.डेल्टा कॅपन (१९९७)

'पालकांचा शाळेतील सहभाग' या विषयांतर्गत बदलणारी समाजतील परिस्थिती आणि पालकांचा शाळेशी असणारा संबंध या विषयाची भूमिका प्रस्तूत शोध निबंधात मांडली आहे.

### क) संशोधनाशी संबंधी प्रत्यक्ष साहित्याचा आढावा :

## तामिळनाडूतील शिक्षण पध्दती : (२०००)

पालक शिक्षक संघाचे महत्व तामिळनाडूतील शिक्षण पहतांना लक्षात येते. तामिळनाडू पंन्नास टक्के शाळा पालकांच्याकडून देणगी, फी, घेवूनच चालविल्या

जातात. यांत मुख्य म्हणजे पालकांच्यात देणगी देण्याबाबत चढाओढ चालू असते. या शाळा स्वावलंबी शाळा म्हणून ओळखल्या जातात या राज्यातील पालक शिक्षक संघ अत्यंत बळकत असून हे संघ शासनाला खालील बाबतीत मदत करतात.

१. मुलांची शाळेत भरती करणे.

२. शाळेतील गळती थांबविणे.

३. शिक्षणांचा दर्जा वाढविण्यास मदत करणे.

४. शाळेत शिस्त राखण्यास मदत करणे.

५. राज्यात मध्यवर्ती सरकारच्या शैक्षणिक योजना राबविण्यासाठी सहकार्य करणे.

६. निधी उभा करून शाळांना इमारती, क्रिडांगणे, कंपाऊड इत्यादी सुविधा पुरविणे.

**भारतीय शिक्षण - (१९९३)**

या भारतीय शिक्षण दिवाळी अंकाचे शीर्षक पालक शिक्षण आहे. या संपूर्ण पुस्तकामध्ये विविध लेख पालक शिक्षक संघाच्या संदर्भातील आहेत. यामध्ये पालकत्वाची संकल्पना, पाल्याभीमुख पालक प्रबोधन, पालक शिक्षण हितगुज, आपल्या मुलांच्या शिक्षणांत पालकांचा सहभाग ,पालकांशी हितगुज,पालकांसाठी व्यवसाय मार्गदर्शन,घटा–घटांचे रूप आगळे या लेखामधून पालक शिक्षक संघाची आवश्यकता, गरज त्याचे महत्व लक्षात येते.

**पै आणि पै (१९९३)**

यांच्या सदर पुस्तकांतून पालक शिक्षक, विद्यार्थी यांचे परस्पर संबंध कसे आसावेत? ते चांगले सौहादपूर्ण असण्याची गरज काय? यांची अतिशय मार्मिक उदाहरणे देऊन महत्व पटवून दिले आहे.

## ३.३ संबंधित संशोधन साहित्याचे सामान्य निष्कर्ष :

१. शैक्षणिक सुविधांचा विद्यार्थ्यांच्या गुणवत्तासुधारणावर परिणाम दिसतो.

२. पालकांच्या सहभागामुळे शाळेच्या विकासामध्ये मदत होते.

३. पालकांचा व्यवसाय कौटूंबिक,सामाजिक, आर्थिक, परिस्थितीचा परिणाम विद्यार्थ्यांच्या गुणांवर होतो.

४. मार्गदर्शनाशिवाय असणाऱ्या विद्यार्थ्यास उच्चपदावर पोहोचण्यास त्रास होतो.

५. पालकांच्या व्यवसाय मार्गदर्शनाचा परिणाम विद्यार्थ्यांच्यावर होतो.

संशोधन समस्येशी निगडीत साहित्याच्या निष्कर्षाच्या आधारे असे लक्षात येते की, संशोधिकेने संशोधनासाठी जो विषय निवडलेला आहे, तो विषय या पुर्वी कधीही संशोधनासाठी निवडलेला नाही. पालक शिक्षक संघाच्या कार्यपध्दती विषयी जनमानसांत उत्सुकता जाणवते. पालक शिक्षक संघ आज सर्व शाळेत कार्यरत असला तरी, तो नेमकी कोणती भूमिका पार पाडत आहे हे जाणणे महत्वाचे आहे. विद्यार्थ्याच्या प्रगतीतच देशाची प्रगती दडलेली असते. म्हणून पालकांची जागरूकता महत्वाची आहे. या दृष्टीने विचार करता हे संशोधन अत्यंत महत्वाचे आणि पूर्णतः वेगळे आहे.

## ३.३ समारोप –

सदर प्रकरणात पालक शिक्षक संघ याविषयांशी संबंधीत असलेल्या संशोधन साहित्याचा आढावा घेतलेला आहे.

पुढील प्रकरणात संशोधनाच्या कार्यपध्दती विषयी चर्चा केली आहे

LIBRARY KOLHAPUR